## नमुना दोन

ग्राम :-

दूरध्वनी :- ०२५७-२२२९४८७

ई - मेल :- ssa_zpjalgaon@yahoo.com

फॅक्स :-

जावक क्र. **शिक्षण/सशिअ/संगणक/आरआर/२१/२०२१**

**दिनांक :- २५/०१/२०२१**

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय :- **शिक्षण विभाग (प्राथ), जिल्हा परिषद, जळगांव**

(जिल्हा / राज्य यांचे नाव) :- **जळगांव (महाराष्ट्र)**

क्रमांक :- **27030103607**

**दिनांक :- २५/०१/२०२१**

व्यवस्थापक :- **लोकमान्य टिळक एज्युकेशन सोसायटी, धुळे ता.जि.धुळे**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांन मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...**

**माननीय महोदय/महोदया,**

आपल्या **दिनांक १९/०८/२०२०** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी या आधारे.

**मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.जळगांव दिनांक ०१/०४/२०१९ पासुन दिनांक ३१/०३/२०२२** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी (स्वयं अर्थ सहाय्यता शाळा)** करिता **सायरदेवी बोहरा सेंट्रल स्कुल मंगरुळ ता.अमळनेर जि.जळगांव** (शाळेचे नांव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे, शाळा पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४. **परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल,** अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणतयाही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

**(पाच)** विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

Scanned with CamScanner

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकूण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ
- वर्गखोल्यांची संख्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर.
- अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडा विषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक **RTE 0101043** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

आपला विश्वासू

जिल्हा शिक्षणाधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव.

Scanned with CamScanner

Translate Copy

**Proforma Two**

Jav.No/Edu/Sedu/comp/RR/21/2021
District Education Office:-Education Officer (Primary)
Zilha Parishad, Jalgaon district- Jalgaon
(District/State) - Jalgaon (Maharashtra)

**Udise Number- 27030103607**
Director: Lokmanya Tilak Education Society,Dhule Tal-Dist-Dhule

**Date- 25/01/2021**

**subject:** RTE certificate issued under Children's Right to Free and Compulsory Education Act 2009 Section 18 and Children's Right to free and Compulsory Education Act 2011 Section 11, Sub-Section (4)

R/S Sir/Madam

With reference to your application dated 19/08/2020 and after a consecutive inspection of the school, I District Education Officer (Primary), Zala Parishad, Jalgaon, grant permission provisionally to Sayardevi Bohra Central School Mangrul,tal-Amalner dist-Jaogaon, to Run the Classes at elementary **level (1-8) for the period of 01/04/2019 to 31/03/2022**

The permission is granted under following provisions

1. The duration of permission will not be increased and this office is not bound to give permission for classes after eighth.

2. The school will follow provisions of Children's Right to Free and Compulsory Education Act 2009 and Maharashtra State Children's Right to Free and Compulsory Education Act 2011.

3. The School will reserve 25% of its seats of class 1st for Weaker and Economically Weaker sections of society and admit them. The school will provide free and compulsory education to these children till completion of their elementary education. Further, the same provisions will be applicable on Pre primary classes

4. The school will get fee reimbursement for students mentioned in par 3 under section 12(2) of the Act and for this the school should maintain a separate bank account.

5. The school will not charge any capitation fee and will not impose any pressure and favoritism on parent for admission.

6. The school will not refuse the admission on the basis of religion, cast, category, birth place or any other region.

7.

(1) None of the student who is admitted to school will be detained in the class in which he was admitted and school will not struck him off after completion of Primary Education.
(2) No student should be punished physically and mentally.
(3) No student will be bound to pass any of the Board's exam after completion of primary education.
(4) Students will be provided with Completion certificate after completion of primary education as per the given format under section 23 of the act.

(5) Divyang /CWSN children will be included as per the act
(6) School will appoint qualified teachers as per the provisions of section 23 (1) of the pet.
(7) Teachers will be abide to follow the duties mentioned in section 24(1) of the act.

(8) Teachers should not involve themselves in private tuition's and if they are found doing so the School will be answerable.

8. School will follow the curriculum proposed by the government.
9. School will give admission as per the physical facilities available under section 19 of the act.

Scanned with CamScanner

10. School will follow the provisions of section 19. The school have following physical facilities as per the last inspection done:

- Total area of school premises
- Buildup area
- Play Ground
- No. of Class Rooms
- Other rooms including Principal Room
- Healthy Sanitary and drinking water conditions
- Kitchen for MDM
- Availability of teaching learning material/sport material
- Library Reading Material

11. School will not run the classes and courses without permission,
12. School will use its premises only for educational or skill development activities.
13. School will run by the society registered under Society's Registration Act 1860 or Mumbai Public Trust act 1950
14. School will run under Non Proprietary and Non Profit Basis.
15. School's accounts are being audited by CA and will be shown and submitted at the time of Inspection.
16. School is allotted with code **RTE 0101043** for further reference.
17. School will provide various information to Director of Education/Education Office whenever asked.
18. School will renew all the document and permission time to time.
19. Other terms provided with Proforma 3.

TRUE-COPY

22/10/2021

Adv. Krutika J. Afre
NOTARY
(Govt. of Maharashtra)
Plot No.14 Ashirwad Bhavan
Chatrapati Shivaji Nagar,
Parola. Dist.Jalgaon

NOTARY
ADVOCATE
Krutika J. Afre
PAROLA, (Mah.)
Reg.No.1228
Exp.Date
28/03/2022
GOVT. OF MAHARASHTRA

Scanned with CamScanner